# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

जा.क्र.मऔविम/भूविभाग/कार्या-१/ B99393 दिनांक : 17/6/19

## परिपत्रक

**विषयः- उद्योग विस्तारासाठी वाटप केलेला भूखंड किंवा मूळ भूखंड ५ वर्षाच्या कालावधीपूर्वी हस्तांतरणास परवानगी देणे..**

संदर्भ :- परिपत्रक क्र. मऔविम/विधी व कामकाज विभाग/१५३/२०१२, दिनांक २७.०४.२०१२

महामंडळाच्या वरील संदर्भिय परिपत्रकामधील धोरणानुसार उद्योग विस्ताराकरीता प्राधान्याने भूखंडाचे वाटप करण्यात येते. उक्त परिपत्रकातील मुद्दा क्र. ७ अन्वये, उद्योग विस्तारासाठी वाटप केलेल्या भूखंडाचे तसेच मूळ भूखंडाचे हस्तांतरणास, पुढील पाच वर्षे परवानगी देण्यात येऊ नये, असे धोरण आहे.

मा. संचालक मंडळाच्या दि. २८.१२.२०१८ रोजी झालेल्या ३७८ व्या बैठकीतील पारित ठराव क्र. ५८२९ अन्वये, महामंडळामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या दि. २७.०४.२०१२ च्या परिपत्रकामधील मुद्दा क्र. ७ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा/बदल करण्यात येत आहे-

| मुद्दा | ऐवजी | वाचावे |
|---|---|---|
| क्र. ७ | उद्योग विस्तारासाठी वाटप केलेल्या भूखंडाचे तसेच मूळ भूखंडाचे हस्तांतरणास, पुढील पाच वर्षे परवानगी देण्यात येऊ नये. | तथापि, अशा प्रकारे वाटप करण्यात आलेल्या भूखंडावरील उद्योग अवसायनात निघणे, उद्योजकाचे दुर्धर आजाराचे कारणास्तव उदा. कॅन्सर, इत्यादी कारणास्तव भूखंडधारकाच्या आवाक्याबाहेरील टाळता न येणा-या परिस्थितीमध्ये उद्योजकाला पुढे उद्योग चालू ठेवणे शक्य होत नसल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पूर्व मान्यतेने पाच वर्षांच्या कालावधीपूर्वी उद्योग विस्ताराकरीता वाटप केलेला भूखंड किंवा मूळ भूखंड महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार हस्तांतर करता येईल.<br>अशा प्रकरणांमध्ये उचित निर्णय घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहेत. |

याव्यतिरिक्त सदरहू परिपत्रकामधील धोरणांमध्ये इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(अविनाश सुभेदार)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई